**<u>महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम,</u>**
**<u>१९६६ चे कलम १५४ अन्वये निदेश.</u>**
महाराष्ट्राचे इलेक्टीक व्हेईकल प्रोत्साहन धोरण-२०१८ अनुषंगाने अंमलबजावणी बाबत...

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**शासन निर्णय क्रमांक : टिपीएस-१८१८/अनौसं-०१/प्र.क्र.१२१/१८/नवि-१३**
**दिनांक :२३/०४/२०१८.**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६**

महाराष्ट्र राज्य हे जागतिक स्तरावर इलेक्ट्रीक व्हेईकल व त्यांच्या सुट्या भागांचे उत्पादन आणि जास्तीत जास्त इलेक्ट्रीक व्हेईकल वापर करणारे स्पर्धात्मक राज्य बनविणे, जागतिक स्तरावरील गुंतवणूकदारांकरीता सर्वाधिक पसंतीच्या ठिकाणामध्ये महाराष्ट्राचा समावेश करणे तसेच प्रवर्तन नितीद्वारे स्पर्धात्मक आणि शाश्वत गुंतवणूकीस योग्य वातावरण असलेले राज्य म्हणून विकसित करुन महाराष्ट्राला सर्वाधिक पसंतीचे आर्थिक आकर्षणाचे केंद्र बनविणे तसेच इलेक्ट्रीक व्हेईकल क्षेत्रामधील सुक्ष्म, लघू व मध्यम उद्योग (MSMEs) यांना जागतिक स्पर्धात्मक वातावरणासाठी सक्षम करण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्राचे इलेक्ट्रीक व्हेईकल उत्पादन धोरण-२०१८ राज्याच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाने दि.१४/०२/२०१८ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे जाहीर केलेले आहे. या धोरणातील नमूद बाबींच्या अनुषंगाने राज्यभरात विविध ठिकाणी सार्वजनिक चार्जींग पॉईंटला परवानगी देणे आवश्यक आहे.

सबब राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांना / विशेष नियोजन प्राधिकरणांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम-१५४ अन्वये खालील प्रमाणे निदेश देण्यात येत आहेत.

*"निदेश*

*पार्कींग क्षेत्र, निवासी क्षेत्र, सोसायटया, बस डेपो, रेल्वे स्टेशन आणि इंधन पंप इत्यादी ठिकाणी नियमित कामकाजास अडथळा येणार नाही या पध्दतीने तसेच अग्नि सुरक्षा व इतर अन्य सुरक्षिततेच्या अधीन राहून सार्वजनिक चार्जींग पाईंटला च.क्षे.निर्देशांकात परिगणना न करता परवानगी देता येईल. याबाबतची मागणी प्राप्त झाल्यानंतर संबंधित नियोजन प्राधिकरणांनी इतर मुद्यांबाबत प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार छानणी करुन १५ दिवसात परवानगी द्यावी".*

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

URBAN DEVELOPMENT DEPTT. सत्यमेव जयते MANTRALAYA, MUMBAI-32

(रा.म.पवार)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

कृ.मा.पहा

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

२) मा.राज्यमंत्री, (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) अप्पर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.

४) अप्पर मुख्य सचिव, उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.

५) प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रति,**

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

/- सदरचे निदेश नगर रचना संचालनालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करावेत ही विनंती.

२) सह संचालक, नगर रचना, पुणे / कोकण / नागपूर / अमरावती / औरंगाबाद / नाशिक.

३) संचालक, नगर रचना तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

४) महानगर आयुक्त, मुंबई / पुणे / नागपूर / नाशिक / औरंगाबाद.

५) व्यवस्थापकीय संचालक, सिडको.

६) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.

७) मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण.

८) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई.

९) चेअरमन, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.

१०) उप संचालक, नगर रचना तथा उप सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

११) आयुक्त, सर्व महानगरपालिका (विभागीय कार्यालयामार्फत).

१२) नगर रचना विभाग, सर्व शाखा कार्यालय (विभागीय कार्यालयामार्फत).

१३) मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा / नगरपंचायती (शाखा कार्यालयामार्फत).

१४) अवर सचिव, नवि-११, नवि-३०/ कक्ष अधिकारी,नवि-९, नवि-१२ नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१५) कक्ष अधिकारी (नवि-२९) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

/-त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची सूचना या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

१६) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.

/-त्यांना विनंती करण्यात येते की, सदरची सूचना शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

१७) निवड नस्ती (कार्यासन-१३).

*******